Annexure XXV(1),(Vide Article-25.07)

शासनाच्या वन विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांची.
वेतन व भत्त्याची देयके कोषागारातून पारीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : मकोनि-१०००/प्र.क्र.४४/०५/कोषा-प्र-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ जानेवारी, २००६

शासन निर्णय :

शासनाच्या वन विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सद्यस्थितीत सर्व प्रकारच्या खर्चाची देयके कोषागारांच्या/बँकेच्या नांवे धनादेश काढून आहरीत करता येतात. इतर शासकीय विभागांच्या कार्यालयांना मात्र याकरीता कोषागारात देयके सादर करावी लागतात. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या या विशेषाधिकारांमुळे अनियमितता होत राहतात. अलीकडे या अनियमिततांमध्ये सतत वाढ होत आहे असे शासनाच्या निदर्शनास येत आहे. अशा अनियमिततांना निर्बंधित करण्यासाठी शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, फेब्रुवारी, २००६ पासून सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांप्रमाणेच, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी, वन विभागाच्या योजनांवरील खर्च व आकस्मिक खर्च वगळता अन्य सर्व म्हणजेच कार्यालयातील नियमित कर्मचाऱ्यांच्या तसेच अधिसंख्य पदावरील वन मजुरांच्या वेतन भत्त्यांच्या खर्चाकरीता महाराष्ट्र कोषागार नियम, खंड-एक मधील नियम ४४९(१) व प्रकरण पांच मधील तरतुदीनुसार, विहित नमुन्यातील देयके तयार करुन, वन विभागाची कार्यालये ज्या ठिकाणी स्थित आहेत तेथील नजीकच्या कोषागारात/उप कोषागारात सादर करुन, रक्कम आहरीत करावी. या व्यतिरिक्तच्या खर्चाची देयके मात्र प्रचलित पध्दती नुसार वन अधिकाऱ्यांनी धनादेशाद्वारे प्रदान करावीत. यासंदर्भातील लेखांकन पध्दतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

२. कोषागारातून उपरोक्त खर्चाकरीता देयके सादर करुन रकमांचे आहरण करण्यासाठी महसूल व वन विभागाने महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-एक मधील नियम १३ नुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची यादी शासन निर्णयाद्वारे निर्गमित करावी. तसेच महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-एक मधील नियम १५(२) व १५(३) नुसार संबंधित महालेखापाल यांचेकडून प्राधिकारपत्र प्राप्त करावे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपरोक्त शासन निर्णयाची प्रत पाठवून संचालक लेखा व कोषागारे, मुंबई यांजकडून संगणक संकेतांक प्राप्त करुन घ्यावे.

३. वेतन व प्रवास भत्यासहित सर्व अनुज्ञेय भत्त्याच्या खर्चाची तरतुद शासन वन विभागाने विहीत कार्यपध्दतीनुसार अंदाजपत्रकात करावी. वेतन देयकात अर्थसंकल्पीय तरतुदीचा रकाना पुर्णपणे व बिनचूक भरावा. वेतन देयकात खर्चाचे वर्गीकरण संकेतांकासह पूर्णपणे व अचूकपणे नमुद करावे.हे वर्गीकरण अर्थसंकल्पातील वर्गीकरणाशी जुळणे आवश्यक आहे. वेतन देयकात विभागवार/पदनामवार मंजूर पदे व वेतनश्रेणी नमूद करणे आवश्यक आहे. वेतन देयकात अस्थायी पदे अंतर्भूत असल्यास, ती चालू ठेवण्यास ज्या आदेश क्रमांक व दिनांक अन्वये मंजुरी देण्यात आली आहे, त्याचा उल्लेख तसेच ज्या कालावधीपर्यंत मंजुरी दिली आहे, त्याचाही उल्लेख वेतन देयकात स्पष्ट नमूद करावा. देयकासोबत



13 JAN 2006

वजातीबाबत सर्व आवश्यक अनुसूच्या जोडाव्यात, तसेच आवश्यक ती प्रमाणपत्रे नमूद करण्यात यावीत. आता ई-पे बील योजना अंमलात आणण्यात येत आहे, यास्तव आहरण व संवितरण अधिका-यांनी सेवार्थ आज्ञावलीतील नमुना A व B मधील माहिती संकलित करुन त्याच आज्ञावलीतील नमुन्यात वेतन देयके तयार करुन कोषागारांना सादर करावीत.

४. उपरोक्त संदर्भात महाराष्ट्र कोषागार नियम १९६८, खंड- एक मधील नियम ४६४ ते ४६६ मध्ये तसेच मुंबई वित्तिय नियम यातील संबंधित नियमात यथावकाश सुधारणा करण्यात येईल.

५. हे आदेश महालेखापाल (ले. व अ.)- दोन ,महाराष्ट्र, नागपूर यांच्या अर्धशासकीय पत्र क्रमांक TM/Gr.VIII/Forest/९९, दिनांक १५/४/२००५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( कविता गुप्ता )
शासनाचे सचिव.

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखा परीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर,
५) महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा ), महाराष्ट्र, मुंबई,
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७) सचिव (वने), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
८) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९) मुख्य लेखापरिक्षक,स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे,
११) उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, कोकण विभाग, नवी मुंबई,
१२) मुख्य वनसंरक्षक, वन विभाग
१३) सर्व वनसंरक्षक, वन विभाग,
१४) सर्व विभागीय वन अधिकारी,
१५) सर्व कोषागार अधिकारी,
१६) सर्व उपकोषागार अधिकारी,
१७) कार्यासन अधिकारी, व्यय-१० व विनियम, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
१८) निवड नस्ती, कोषा- ५.

------

एच-1388 -1अ.